# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेव्दारा मंजूर अंदाजपत्रकानुसार विविध पदातंर्गत
**{स्थापत्य विभाग}** सन 2019-2020 या आर्थिक वर्षात स्थापत्य स्वरुपाच्या विविध विकास कामांना आवेदन/निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यादेश निर्गमित करण्यात आले तसेच काही कामांकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली मात्र **कोविड-19 चे प्रादुर्भावामुळे** कार्यादेश निर्गमित करण्यात आले नाहीत व ज्या कामांकरीता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आली होती अशी कामे सुरु करता आली नाहीत. या संबंधाने संबंधित झोनचे कार्यकारी अभियंता यांचे कडून खालील प्रमाणे झोन निहाय प्राप्त एकूण ३६६ कामे रद्द करुन अनामत रक्कम, सुरक्षा ठेव परत करण्याची शिफारस मा. आयुक्त तथा प्रशासक, यांचे कडे झोन निहाय यादी प्रमाणे प्रमाणीत केल्यानुसार करण्यात आली होती.

१. कार्यादेश निर्गमित परंतु सुरु न झालेली कामांची संख्या - २१८
२. निविदा प्रक्रिया पूर्ण मात्र कार्यारंभ आदेश न दिलेल्या कामांची संख्या - १२०
३. निविदा उघडण्यात न आलेल्या कामांची संख्या - २०
४. प्रशासकीय मान्यता प्राप्त मात्र निविदा न मागविण्यात आलेल्या कामांची संख्या - ०८

संबंधित कार्यकारी अभियंता यांनी रद्द करण्याकरीता प्रस्तावित कामातील कोणतेही काम सुरु/पूर्ण करण्यात आलेले नसून, कोणतेही सुरु न झालेले काम रद्द करण्याच्या प्रस्तावातून वगळण्यात आलेले नाही तसेच रद्द केलेल्या कामाचे देयक सादर केल्यास किंवा सुरु काम रद्द झाल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील या अटीवर उपरोक्त प्रमाणे एकूण ३६६ कामे रद्द करुन (झोन निहाय यादी व गोषवारा संलग्न) अनामत रक्कम व सुरक्षा ठेव संबंधित निविदाकारास परत करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 49/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 20/02/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक अभियंता, स्थापत्य विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेव्दारा मंजूर अंदाजपत्रकानुसार विविध पदातंर्गत सन 2019-2020 या आर्थिक वर्षात स्थापत्य स्वरुपाच्या विविध विकास कामांना आवेदन/निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यादेश निर्गमित करण्यात आले तसेच काही कामांकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली मात्र **कोविड-19 चे प्रादुर्भावामुळे** कार्यादेश निर्गमित करण्यात आले नाहीत व ज्या कामांकरीता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आली होती अशी कामे सुरु करता आली नाहीत. या संबंधाने संबंधित झोनचे कार्यकारी अभियंता यांचे कडून खालील प्रमाणे झोन निहाय प्राप्त एकूण ३६६ कामे रद्द करुन अनामत रक्कम, सुरक्षा ठेव परत करण्याची शिफारस मा. आयुक्त तथा प्रशासक, यांचे कडे झोन निहाय यादी प्रमाणे प्रमाणीत केल्यानुसार करण्यात आली होती.

१. कार्यादेश निर्गमित परंतु सुरु न झालेली कामांची संख्या - २१८
२. निविदा प्रक्रिया पूर्ण मात्र कार्यारंभ आदेश न दिलेल्या कामांची संख्या - १२०

३. निविदा उघडण्यात न आलेल्या कामांची संख्या - २०

४. प्रशासकीय मान्यता प्राप्त मात्र निविदा न मागविण्यात आलेल्या कामांची संख्या - ०८

संबंधित कार्यकारी अभियंता यांनी रद्द करण्याकरीता प्रस्तावित कामातील कोणतेही काम सुरु/पूर्ण करण्यात आलेले नसून, कोणतेही सुरु न झालेले काम रद्द करण्याच्या प्रस्तावातून वगळण्यात आलेले नाही तसेच रद्द केलेल्या कामाचे देयक सादर केल्यास किंवा सुरु काम रद्द झाल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील या अटीवर उपरोक्त प्रमाणे एकूण ३६६ कामे रद्द करुन (झोन निहाय यादी व गोषवारा संलग्न) अनामत रक्कम व सुरक्षा ठेव संबंधित निविदाकारास परत करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.